RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक ५८(२)] शुक्रवार, मे ६, २०१६/वैशाख १६, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १३१

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

गृह विभाग (विशेष)

मंत्रालय, मुंबई, दिनांक १४ जुलै २०१५

अधिसूचना

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१.**

क्रमांक डीआयएस. ०२१०/प्र.क्र. ४३४/वि.शा.-१ब.––महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या तरतुदींअंतर्गत ध्वनी प्रदुषण नियंत्रणाकरिता खालील अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात येत आहे :––

| अ. क्र. (१) | क्षेत्र (२) | कार्यकक्षा (३) | अधिकाऱ्याचे पदनाम (४) |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालयाची क्षेत्रे. | सर्व पोलीस स्टेशन क्षेत्र. | संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी. |
| २ | महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये वगळून सर्व जिल्हा क्षेत्रे. | सर्व पोलीस स्टेशन क्षेत्र. | संबंधित पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधिकारी किंवा पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी. |

पोलीस महासंचालक, सर्व पोलीस आयुक्त, सर्व जिल्हादंडाधिकारी आणि सर्व पोलीस अधीक्षक यांना सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी वरील सर्व प्राधिकाऱ्यांची नावे, पत्ते व इतर तपशिलाबाबत स्थानिक वृत्तपत्रे, स्थानिक केबल नेटवर्क, त्यांच्या संकेतस्थळावर तसेच जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका आणि नगर परिषदांच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी. त्यांना अशाही सूचना देण्यात येत आहेत की, वरील प्राधिकाऱ्यांची नावे सर्व महानगरपालिका/नगर परिषदा यांच्या वॉर्ड कार्यालयामधील सूचना फलकांवर स्पष्टपणे दिसेल अशा पद्धतीने दर्शविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. ज. सोवितकर,**
**शासनाचे उप सचिव.**